पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18

अ प्रभाग समिति

सभावृत्तांत [ कार्यपत्रिका क्रमांक 4 ]

दिनांक : 3/10/2017 वेळ : सकाळी 11.00 वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची विशेष सभा [ मा. सभापती, अ प्रभाग समिती यांचे दि. 29/9/2017 रोजीचे पत्रास अनुसरुन ] मंगळवार दिनांक 3/10/2017 रोजी सकाळी 11.00 वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. केशव हनुमंत घोळवे | सभापती |
| 2. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सदस्या |
| 3. | मा. जावेद रमजान शेख | सदस्य |
| 4. | मा. यादव मिनल विशाल | सदस्या |
| 5. | मा. प्रमोद कुटे | सदस्य |
| 6. | मा. राजू मिसाळ | सदस्य |
| 7. | मा. शैलजा अविनाश मोरे | सदस्या / उपमहापौर |
| 8. | मा. बाबर शर्मिला राजू | सदस्या |

याशिवाय श्रीम. आशादेवी दुरगुडे – क्षेत्रीय अधिकारी, श्री संजय खाबडे – मा. कार्यकारी अभियंता, विदयुत, श्री विशाल कांबळे - मा. कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा , श्री. सतिश इंगळे – मा. कार्यकारी अभियंता, स्थापत्य, श्रीम.रेखा गाडेकर – प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), डॉ. सतिश गोरे – मा. पशुवैदयकीय अधिकारी, श्री संजय काशीद, श्री. चंद्रकांत मुठाळ, श्री. सुभाष काळे, श्री. कोल्हे एल.पी., श्री अनिल शिंदे, – उपअभियंता, श्री. महादेव शिंदे – सहा. आरोग्याधिकारी, श्री शेख एस.के., कु. पल्लवी सासे, श्री. हरिदास एस जे - कनिष्ठ अभियंता, श्री नाईक सुहास, श्री जगदाळे संतोष – सर्व्हेअर. श्री पगार एस जी – विदयुत इ. अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. सभापती, श्री. केशव हनुमंत घोळवे यांनी उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, नगरसदस्या तसेच अधिकारी यांचे स्वागत केलेनंतर प्रस्तुतची विशेष सभा सुरु करणेस अनुमती देण्यात आली.

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक 94 | विषय क्रमांक 1 |
| दिनांक 3/10/2017 | विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव |
| सुचक : मा. अनुराधा गोरखे | अनुमोदक : मा. मिनल यादव |

संदर्भ :- मा. सभापती, श्री. केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 29/9/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 शाहूनगर येथे व उपस्थित सन्मा. सदस्यांनी उपसूचना दिलेनुसार / मागणी केलेनुसार प्रभाग क्रमांक 14, 15 व 19 मध्ये रस्त्यांप्रमाणे सोसायटयांचे नामफलक लावणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

[ मा. सभापती यांनी अ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रामधील प्रभाग क्रमांक 10, 14, 15 व 19 मधील सर्व ठिकाणचे माजी सन्मा. नगरसदस्यांचे नावाचे बोर्ड स्थापत्य विभागामार्फत काढणेत येऊन तसा अहवाल whats up वर करणेत यावा अशा सुचना दिल्या. ]

ठराव क्रमांक 95
दिनांक 3/10/2017
सुचक : मा. अनुराधा गोरखे

विषय क्रमांक 2
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. मिनल यादव

संदर्भ :- मा.सभापती, श्री.केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 29/9/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 शाहूनगर येथील तसेच उपस्थित सन्मा. सदस्यांनी उपसूचना दिलेनुसार / मागणी केलेनुसार प्रभाग क्रमांक 14, 15 व 19 मधील कुत्रे व डुक्करे तसेच मोकाट जनावरे यांचे बंदोबस्ताकरीता अ क्षेत्रीय कार्यालयामध्ये स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

[ प्रस्तुत विशेष सभेमध्ये उपस्थित सन्मा. सदस्यांचे मागणीनुसार व मा. सभापती यांचे सुचनेनुसार श्री. सतिश गोरे, मा. पशुवैदयकीय अधिकारी यांनी पशुवैदयकीय विभागाचे कामकाजाबाबत सविस्तरपणे माहिती दिली. यामध्ये सदयस्थितीमध्ये पशुवैदयकीय विभागाकडे दोन गाडया असून पैकी एकच गाडी चालू असून वाहनचालकाचे अभावी दुसरी गाडी बंद आहे. प्राधिकरण व इतर भागामधील मोकाट कुत्री रात्रीचे वेळी पकडावी लागत असल्याने shift duty करणे आवश्यक आहे. तसेच कामकाजाचे विकेंद्रीकरणाबाबत कार्यवाही process मध्ये आहे. त्याकरीता क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रामध्ये पुरेसी जागा उपलब्ध असणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आणून दिले. यावर सभापती यांनी अ क्षेत्रीय कार्यालयामध्ये जागा उपलब्ध करणेकरीता संयुक्तिक visit आयोजित करणेत येईल असे सांगितले. ]

ठराव क्रमांक 96
दिनांक 3/10/2017
सुचक : मा. अनुराधा गोरखे

विषय क्रमांक 3
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. मिनल यादव

संदर्भ :- मा.सभापती, श्री. केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 29/9/2017 चा प्रस्ताव

अ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रामधील प्रभाग क्रमांक 10, 14, 15 व 19 मधील प्रत्येक सोसायटी , बंगलेधारक तसेच सन्मा. सदस्यांचे उपसूचनेनुसार झोपडपट्टी, बैठी घरे, चाळ इत्यादी ठिकाणचे चौकांमध्ये सर्व अधिकारी यांचे नांव , त्यांचे कामाचे स्वरुप तसेच संपर्क नंबर्स, नगरसेवक यांचे नाव, संपर्क नंबरची पत्रके तयार करुन छापून सदर ठिकाणी डकविणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

[मा. सभापती यांनी वरील प्रमाणे पत्रके तयार झालेनंतर सर्व सन्मा. सदस्यांना दाखवून नंतरच find करावीत. तसेच पत्रके छपाईचे कामकाज मध्यवर्ती भांडार विभागामार्फत करणेत येईल व स्थापत्य विभागामार्फत लावणेत येतील असे सांगितले. ]

ठराव क्रमांक 97 विषय क्रमांक 4
दिनांक 3/10/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. सभापती, श्री.केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 29/9/2017 चा प्रस्ताव

अ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रामधील सर्व क्रिडा विभागाची कामे अ प्रभाग मधूनच करणेसाठी आवश्यक मनुष्यबळ अ प्रभाग येथे कार्यान्वीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 98 विषय क्रमांक 5
दिनांक 3/10/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :-मा. सभापती, श्री. केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 29/9/2017 चा प्रस्ताव

उपसूचना :- विषय क्रमांक ५ ला अनुसरुन् सन्मा. सदस्य जावेद शेख यांनी लेखी स्वरुपात पुढील प्रमाणे उपसूचना दिली आहे.

**विषय क्रमांक 5 च्या अनुषंगाने प्राधिकरण व एमआयडीसीच्या रिकाम्या प्लॉटसह प्रभागातील अनेक खाजगी प्लॉट रिकामे असून तेथे गवत, झाडी, झुडपे उगवल्याने डास, मच्छर, सर्प, विंच यांचा वावर असल्याने नागरीकांच्या आरोग्यासह सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे अशा मोकळया भूखंडाच्या मालकांना नोटीस पाठवून स्वच्छ करुन घेणेबाबत सुचित करणे आवश्यक आहे.**

अ प्रभाग हद्दीमधील प्राधिकरण व एमआयडीसी मधील रिकामे प्लॉटस संबंधित संस्थांनी स्वच्छ ठेवणेकामी व वॉल कंपाऊड करणेकामी किंवा सदर भूखंडासंबंधीच्या नियम व अटीशर्तींचे पालन करणेकामी संबंधितांना सुचना देणेस तसेच सन्मा सदस्य यांनी वरील प्रमाणे दिलेल्या उपसूचनेसह मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

[ सन्मा. सदस्य प्रमोद कुटे यांनी काळभोरनगर मधील मनपा शाळेच्या ग्राऊंडवर कंबरेइतके गवत वाढले असलेबाबत मुद्दा उपस्थित केला असता सहा. आरोग्याधिकारी यांनी मनपा शाळेच्या ग्राऊंडवरील वाढलेले गवत काढून घेण्याचे काम शिक्षणमंडळामार्फत केले जाते. तथापि, याबाबत संबंधित शाळेचे मुख्याध्यापक यांना आरोग्य विभागामार्फत पत्रव्यवहार करणेत येईल असे सांगितले. ]

ठराव क्रमांक 99 विषय क्रमांक 6
दिनांक 3/10/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. सभापती, श्री. केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 29/9/2017 चा प्रस्ताव

अ प्रभाग हद्दीमधील लघु, मध्यम व मोठे उदयोजक यांना बोलावून CSR ची गरजेनिहाय कार्ये निश्चित करुन कार्यान्वीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

[ मा. सभापती यांनी वरील विषयाचे अनुषंगाने संबंधित उदयोजकांना पत्र देऊन अ क्षेत्रीय कार्यालयामध्ये मिटींगकरीता बोलवावे. तसेच मा. माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, ईगव्हर्नन्स विभाग व क्षेत्रीय कार्यालयाचे अधिकारी यांचे coordnation ने सदरचे कामकाज करणेत येईल असे सांगितले. ]

ठराव क्रमांक 100
दिनांक 3/10/2017
सुचक : मा.जावेद शेख

विषय क्रमांक 7
विभाग : नगररचना व विकास
अनुमोदक : मा. अनुराधा गोरखे

संदर्भ :- मा. उपसंचालक, नगररचना व विकास विभाग यांचेकडील पत्र क्रमांक नरवि/कावि/15/ पिंपरी/254/2017 दि. 15/9/2017

फ प्रभाग समिती ठराव क्रमांक 8 दि. 8/7/2016 अन्वये प्रभाग क्रमांक 28 मासुळकर कॉलनी येथील भाग अत्याधुनिक सोयीने विकसित होत असून नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने व मुख्य रस्त्यावर होणा-या गाडयांच्या वाहतुकीस पर्यायी उपलबधता होणे अत्यंत गरजेचे आहे. प्रभाग क्रमांक 28 टेल्को सिमाभिंती लगतचा रस्ता [W सेक्टर] ते मोरवाडी आयटीआय रस्ता [ स.नं. 139/140 येथील अमृतेश्वर ट्रस्टची जागा ] महानगरपालिका अधिनियम 2005 मधील कलम 205 नुसार नागरिकांच्या सोयीसाठी पर्यायी रस्ता म्हणून घोषित करणेकामी ठराव मंजुर करणेत आला होता. त्यानुसार मा. आयुक्त सो. यांचेकडील दि. 3/12/2016 रोजीच्या प्रस्तावान्वये विषयांकित प्रकरणी कार्यकारी अभियंता स्थापत्य् , फ क्षेत्रीय कार्यालय व अमृतेश्वर ट्रस्ट यांचे सहमतीने केलेला पर्यायी रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 205 नुसार घोषीत करणे प्रकरणी नागरीकांच्या हरकती/सुचना मागविण्यासाठी दि. 17 डिसेंबर 2016 रोजीच्या दै. आज का आनंद, दै प्रभात व दै. पुण्यनगरी या वृत्तपत्रांमध्ये जाहीर प्रकटन देण्यात आले होते.

सदरच्या वृत्तपत्रामधील जाहीरातीस अनुसरुन् एक हरकत/सुचना उपसंचालक, नगररचना, पिंपरी यांचेकडे प्राप्त झालेली होती. त्यास अनुसरुन संबंधित हरकतदारास दि. 1/6/2017 व दि. 22/6/2017 रोजी सुनावणीस बोलावूनही हरकतदार सुनावणीस अनुपस्थित राहिल्याने हरकतदाराची हरकत नरवि/कावि/15/ 208/2017 दि. 17/7/2017 रोजीच्या सभावृत्तातांन्वये फेटाळण्यात आलेली आहे.

तरी पिंपरी वाघेरे सर्व्हे नंबर 139 व 140 मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 205 नुसार नागरिकांच्या सोयीसाठी रस्ता घोषित करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

प्रस्तुत विशेष सभेमध्ये उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांनी त्यांचे प्रभागामधील पाणीपुरवठा अत्यंत विस्कळीत असून नागरीकांचे दररोज याबाबत फोन येत असतात. प्रभागामध्ये किमान एकवेळ तरी पाणीपुरवठा प्रेशरने करणेत यावा अशी मागणी करुन प्रभागातील पाणीपुरवठा विषयक कामकाजासंदर्भात अत्यंत नाराजी व्यक्त केली. याबाबत मा. कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा यांनी पाणीपुरवठा विस्कळीत होण्याची कारणे तसेच अ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रांतर्गत होणा-या पाणीपुरवठाबाबतची माहिती दिली. तथापि, मा. सभापती यांनी या संदर्भात सर्व प्रभागांमध्ये पाणीपुरवठा होणा-या पाईपलाईन्सची समक्ष पाहणी संबंधित सन्मा. सदस्य व अधिकारी यांचे समवेत करणेकामी नियोजन करणेच्या सुचना दिल्या.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

[केशव हनुमंत घोळवे]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्र. अक्षेका/11/कावि/1257/2017
दिनांक 5/10/2017

प्रशासन अधिकारी
तथा सचिव
सभा शाखा
अ प्रभाग समिती,
निगडी-44

प्रति,
सर्व संबंधित